# वसई-विरार शहर महानगरपालिका
## अनधिकृत बांधकाम विभाग

दि.२९/०९/२०२२

**प्रेसनोट**

वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती 'एफ' कार्यक्षेत्रातील दूधवाला कंपाऊंड, पेल्हार, नालासोपारा पूर्व येथे अंदाजे १० हजार चौ.फुट क्षेत्रफळ बांधकाम केलेल्या दोन अनधिकृत इमारतींवर तसेच प्रभाग समिती 'एफ' पेल्हार कार्यालयाजवळील एका ४ मजली अनधिकृत इमारतीवर मा.आयुक्त श्री.अनिलकुमार पवार व मा.अति.आयुक्त श्री.आशिष पाटील यांचे निर्देशानुसार दि.२९ सप्टेंबर, २०२२ रोजी उप-आयुक्त श्री.अजित मुठे यांचे मार्गदर्शनाखाली निष्कासनाची कारवाई सुरु करण्यात आली आहे.

वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रात होणाऱ्या अनधिकृत बांधकामांविरुद्ध कारवाई करण्याचे आदेश महानगरपालिका आयुक्त श्री.अनिलकुमार पवार यांनी सर्व प्रभाग अधिकाऱ्यांना दिलेले आहेत. त्या अनुषंगाने महानगरपालिका क्षेत्रातील झालेल्या अनधिकृत बांधकामांवर निष्कासनाची कारवाई गेल्या काही दिवसांपासून मोठ्या प्रमाणात सुरु करण्यात आलेली आहे. गेल्या काही दिवसांपासून शहरातील अनधिकृत बांधकामे व अनधिकृत फेरीवाले यांच्या विरुद्ध महानगरपालिकेने कारवाई हाती घेतली आहे. त्या अनुषंगाने रोज हजारो चौ.फुट अनधिकृत बांधकामांवर, शेड, गाळयांवर उप-आयुक्त अजित मुठे यांच्या नेतृत्वाखाली कारवाई सुरु आहे.

आज महानगरपालिका क्षेत्रातील दुधवाला कंपाऊंड, पेल्हार, वालीव इत्यादी ठिकाणी मोठ्या प्रमाणात तोडक कारवाई करण्यात आली. दूधवाला कंपाऊंड येथे सुरु असलेल्या इमारतीच्या अंदाजे १० हजार चौ.फुटाच्या बांधकामांवर तर पेल्हार कार्यालयाजवळील एका चार माजली इमारतींवर कारवाई सुरु करण्यात आली. तर प्रभाग जी मध्ये ससुनवघर हॉटेल वॉलटन मागे ५३०० चौ.फुटाचे पत्राशेड तर हॉटेल यदुवंशी ढाबा येथे १००० चौ.फुटाचे शेड तर जुचंद्र व बापाणे हायवे लगत एकत्रित ३००० चौ.फुटाचे शेड बांधकाम तोडण्यात आले.

पेल्हार प्रभागातील बांधकामांवर कारवाई करतेवेळी उप-आयुक्त अजित मुठे, सहाय्यक आयुक्त शशिकांत पाटील, कनिष्ठ अभियंता किशोर पोवार व केयूर पाटील, एम.एस.एफ जवान, अतिक्रमण विभागाचे कर्मचारी उपस्थित होते.

तर प्रभाग जी मध्ये श्रीमती धनश्री शिंदे प्रभाग अधिकारी यांच्या नेतृत्वाखाली कारवाई करण्यात आली. यावेळी अतिक्रमण विभागाचे कनिष्ठ अभियंता कल्पेश कडव, विजय नडगे व कर्मचारी वर्ग उपस्थित होते.

मा.आयुक्त महोदयांनी दिलेल्या निर्देशानुसार पेल्हार विभागासह संपूर्ण महानगरपालिका क्षेत्रात होत असलेल्या अनधिकृत बांधकामांवर नियमित कारवाई सुरु करण्यात आली आहे.

**अनधिकृत बांधकाम विभाग**
**वसई विरार शहर महानगरपालिका**